॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

Phone: (02462) 215246

SPECIAL CELL

website: srtmun.ac.in

E-mail: specialcell@srtmun.ac.in

प्रस्तुत विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागात सादर होणा-या प्रस्तावावरील स्वाक्षरी बाबत.

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी विशेष कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ या विभागात जाहिरात मसूदा मंजूर करणे (नियमित व घडयाळी तासिका), बिंदूनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करणे, आरक्षण निर्धारित करणे व तसेच इतर कार्यालयीन प्रस्ताव महाविद्यालयाकडून प्राचार्यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात येत आहेत. यास विद्यापीठाकडून मान्यता दिल्यानंतर काही संस्था मा.उच्च न्यायालयात विद्यापीठाच्या/प्राचार्यांच्या विरोधात याचिका दाखल करीत आहेत असे निर्दशनास आले आहे. त्यामुळे यापुढे संस्थेचे मा.अध्यक्ष/ मा.सचिव यांची अथवा ज्यांना संस्थेच्या घटनेनुसार अधिकार आहे त्यांची व प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांचा सही व शिक्का असणे बंधनकारक करण्यात येत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे सर्व अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संलग्नित महाविद्यालयांनी या बाबींची नोंद घेवून या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

कुलसचिव

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जा.क्रं.:- विशेष कक्ष/२०२५-२६/ 187
दिनांक :- २८/०७/२०२५

**प्रत माहितीस्तव :-** मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव :-**

१) मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

२) श्री. ए.ए. दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात यावे.